# मोतीबिंदू शस्त्रक्रियोत्तर जंतुसंसर्ग-प्रतिबंध व उपाय-एक कार्यशाळा

पुणे, दि. ११: रविवार दि. ९ सप्टेंबर २००१-डोळ्याच्या आतील भागात होणारा जंतुसंसर्ग अर्थात् एन्डॉफ्थाल्मार्याटिस् ह्या विषयावर गडकरी आय सेंटरतर्फे अरोरा टॉवर्समध्ये एक दिवसाची कार्यशाला भरविण्यात आली.

पूना आफ्थाल्मॉजिकल सोसायटी (पी.ओ.एस.) चा ह्यात सहभाग होता. राज्यभरातून १५० नेत्रतज्ज्ञ ह्या कार्यशालेत भाग घेण्यासाठी आले होते. माननीय श्री. प्रतापराव पवार, एम.डी., सकाळ पेपर्स लिमिटेड, ह्यांनी ह्या कार्यशालेचं उद्‌घाटन केले.

डॉ. सलिल गडकरी, नेत्रपटल रोग विशेषज्ञ, ह्यांनी ह्या जंतुसंसर्गाच्या अद्ययावत इलाजांचा आढावा घेतला. एल.व्ही.प्रसाद आय इन्स्टीट्यूट, हैदराबाद चे डॉ. ताराप्रसाद दास यांनी उपस्थित डॉक्टरांच्या पश्नांची उत्तरे थेट हैदराबादहून लाइव्ह दिली. मुंबई व पुण्यातील प्रस्थापित नेत्रतज्ज्ञांनी ह्या कार्यशालेत आपले विचार मांडले. पी.ओ.एस.चे अध्यक्ष व जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ. श्रीकांत रानडे म्हणाले की, अशा कार्यशाला भरविल्याने प्रचलित इलाज पद्धती सुधारतात व प्रगत होतात. डॉ. मोहन जोशी व डॉ. प्रकाश मराठे ह्यांनी उपस्थितांचे स्वागत केल.

अधिक माहितीसाठी संपर्क: श्री. जुबेर पूनावाला-९८२३०-४६५४४३.




जंतुसंसर्ग प्रतिबंध व उपाय कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी डॉ. सलील गडकरी, डॉ. रानडे व प्रमुख पाहुण प्रतापराव पवार दीप प्रज्ज्वलन करित असताना

India Media Monitor